**आजचा शुभ विचार**

"नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःच्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर


RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!








मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-51 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Thuresday 26 June 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ५१ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ गुरुवार, दि. २६ जुन २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये


## 'आज तुम्ही पंतप्रधानांना शिव्या देऊ शकता', आणीबाणीवर बोलताना मुख्यमंत्री फडणवीसांचं अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर विधान

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------



"आणीबाणीच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेले संविधान संपविण्यात आले होते. सर्वच विरोधी पक्ष त्यावेळी आणीबाणीच्या विरोधात रस्त्यावर उतरले. त्यांना तुरुंगात डांबण्यात आले. ज्यांचे लग्न झाले नव्हते, त्यांचेही कुटुंब नियोजनाचे ऑपरेशन करण्यात आले. अनेक घरांची तोडफोड करण्यात आली. अनुशासनाच्या नावाखाली अशरक्षः उन्माद त्या काळात देशाने पाहिला. या सर्वांची बातमी होऊ नये म्हणून वृत्तपत्रावर निर्बंध आणले गेले", अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आणीबाणीच्या विरोधात बोलताना दिली.

संविधान हत्या दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत असताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "अलीकडे कुणीही उठते आणि लोकशाहीची गळचेपी, लोकशाहीची हत्या होत आहे, असे सांगते. पण त्यांनी आणीबाणीच्या कालखंडाकडे बघितले पाहिजे. मग त्यांच्या लक्षात येईल की, आज भारतामध्ये कुठल्याही चौकात उभे राहून देशाच्या पंतप्रधानांना शिव्या देऊ शकता. तरी तुमच्यावर कुणीही कारवाई करत नाही. भारताची लोकशाही आज जिवंत आहे. कारण त्याकाळी लोकतंत्र सेनानींनी संघर्ष करून लोकशाही टिकवली."

देशात लागू केलेल्या आणीबाणीच्या निर्णयाला ५० वर्ष झाल्यानिमित्त आणीबाणीत संघर्ष करणाऱ्यांच्या स्मरणार्थ मुंबई येथे संविधान हत्या दिन कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर मान्यवर उपस्थित होते. आणीबाणीमध्ये झालेल्या गळचेपीची माहिती देतान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी मंत्री जॉर्ज फर्नांडिज यांचे उदाहरण दिले. फर्नांडिज भूमीगत झाल्यामुळे त्यांचा भाऊ आणि आईचा खूप छळ करण्यात आला. ज्यामुळे त्यांच्या भावाला जबर मानसिक धक्का बसला, त्यातून ते बाहेर येऊ शकले नाहीत, अशी आठवण फडणवीस यांनी सांगितली. तसेच तुरूंगात टाकलेल्या अनेकांची कुटुंबे उध्वस्त झाली. त्यामुळेच आम्ही लोकतंत्र सेनानींचा सन्मान करण्यासाठी २०१७ साली मानधन देण्याचा निर्णय घेतला, असेही ते म्हणाले.

## श्वेतपत्रिका एसटीची कि, खाजगीकरणाच्या दिशेने वाटचाल..? धनाड्यांच्या घशात एस टी महामंडळ घालण्याचा कुटील डाव

### महाराष्ट्र एस टी कामगार सेनेचे सरचिटणीस हिरेन रेडकर यांचा प्रशासनाला सरळ सवाल

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------------



एसटी महामंडळाच्या तोट्याची कारण मीमांसा शोधण्यासाठी आणि त्यावर उपाययोजना करण्यासाठी राज्याचे परिवहन मंत्री तथा एस टी महामंडळाचे अध्यक्ष ना. प्रताप सरनाईक यांनी दिनांक २३/६/२०२५ रोजी एसटी महामंडळाची श्वेतपत्रिका जाहीर केली आहे. एसटी महामंडळाच्या तोट्याची खरी करणे आणि एसटी महामंडळ नफ्यात येण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजनांना बगल देऊन एसटी महामंडळाच्या खाजगीकरणाची करणाची वाट मोकळी करून दिली आहे.

श्वेतपत्रिकेतुन एसटीचा संचित तोटा १० हजार कोटी रुपये दर्शविण्यात आला असुन या तोट्याची नमुद केलेली ५ कारणे आणि एसटी महामंडळाला नफ्यात येण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजना याची वास्तविकता मात्र वेगळीच आहे..

श्वेतपत्रिकेत दर्शविलेली तोट्याची कारणे

१) राज्य परिवहन महामंडळाकडे बसेसची कमतरता.

राज्य परिवहन महामंडळाकडे बसेसची कमतरता हे कारण महामंडळाच्या तोट्याचे कारण असूच शकत नाही. कमी बसेस मध्ये उत्तम वाहतूकीचे नियोजन करून एसटी महामंडळ फायद्यात येवु शकते परंतु एसटी महामंडळाच्या प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे एसटी तोट्यात गेलेली आहे.

२) उपलब्ध असलेल्या वाहनांचे आयुर्मान अधिक असणे.

उपलब्ध बसेसचे आयुर्मान हे शासनानेच १५ वर्षाचे ठरवलेले आहे. १५ वर्षापेक्षा अधिक आयुर्मान असलेली वाहने स्कॅप करावी लागतात. परंतु वाहनांना योग्य दर्जाचे स्पेअर पार्ट पुरवणे आणि यांत्रिकी कामाकडे दुर्लक्ष करणे या कारणामुळे वाहनांची अवस्था बिकट झाली आहे.

३) अनिवार्य आणि तोट्यातील चालन.

राज्य शासनाने गाव तिथे एसटी ही संकल्पना एसटी वर लादली असुन यामुळे एसटी महामंडळाच्या होणाऱ्या तोट्याची भरपाई कधीही केलेली नाही.

४) अनियमित भाडे वाढ.

इतर राज्याच्या परिवहन सेवेच्या तुलनेत एसटी महामंडळाचे भाडे अधिक आहे. अनियमित भाडे वाढ हे एसटीच्या तोट्याचे कारण असुच शकत नाही..

५) अवैध्य प्रवासी वाहतूक.

राज्यात सर्रास अवैध प्रवासी वाहतूक लोकप्रतिनिधींच्या आशिर्वादाने सुरू आहे. खाजगी एजंट बस स्थानकातुन प्रवासी पळवुन नेतात मात्र आगारातील अधिकारी, परिवहन सेवेतील अधिकारी, वाहतूक पोलीस याकडे दुर्लक्ष करतात याला जबाबदार कोण ?

एसटीच्या तोट्याची वास्तविकता

१)एसटीच्या अधिका-यांचे ढिसाळ वाहतूकीचे नियोजन.

२) एसटीची समांतर वाहतूक.

३) अनिवार्य आणि तोट्यातील फेऱ्यांची नुकसान भरपाई शासनाने न स्विकारणे.

४) खाजगी वाहतूकदारांची मक्तेदारी.

५) एसटीच्या चालक वाहक यांत्रिक कर्मचा-यांवर अविश्वास.

एसटीच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी श्वेतपत्रिकेतून केलेले उपाय योजना या केवळ एसटीच्या खाजगीकरणाचा श्वेतडाव आहे. असे दिसून येते.

उत्पन्नात वाढ होणा-या श्वेतपत्रिकेतील उपाययोजना

१) एसटीच्या ताफ्यात दरवर्षी ५००० हजार बसेसचा समावेश..

स्वागतार्ह निर्णय परंतु अमलबजावणी आवश्यक.

२) राप महामंडळात हायटेक व्हॉल्वो बसेसचा भाडेतत्वावर समावेश.

या बसेस एसटीच्या स्वमालकीच्या असेल तर अधिक उत्तम ठरणार आहे. भाडे तत्वावर घेतलेल्या बसेसचा पूर्वानुभव पहाता हा निर्णय एसटीला आर्थिकदृष्ट्या कमकुवत करणारा आणि एसटीला लुबाडणारा ठरणार आहे.

३) एसटीच्या जागेवर किरकोळ इंधन विक्री.

एसटीच्या जागेवर पेट्रोल पंप सुरू करणे हा चलन व्यतिरिक्त उत्पन्न मिळेल. परंतु याची मक्तेदारी रा. प. महामंडळाची असायला हवी.

४) बीओटी, पीपीपी तत्वावर जागा विकसित करणे.

एसटी महामंडळाच्या जागा बीओटी आणि पी पी पी तत्वावर विकसित करणे म्हणजे ९९ वर्षासाठी करार तत्वावर जागा विकणे आहे. यातुन महामंडळाला आर्थिक फायदा कसा मिळेल? परंतु महामंडळाने स्वतः या जागांचा विकास करुन भाडेतत्त्वावर दिले तर चलना व्यतिरीक्त उत्पन्न महामंडळाला मिळेल.

५) अचलनिय उत्पन्नात वाढ करणे.

एसटीच्या जागा बीओटी आणि पी पी पी तत्वावर विकसित करण्याचा निर्णय घेवुन एसटीच्या अचलनिय उत्पन्नात वाढ कशी करणार ?*

एकुणच परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांनी एसटीच्या नफ्या तोट्याची नाही तर खाजगीकरणाची श्वेतपत्रिका जाहीर केली असेच यातून दिसून येत आहे. एसटी महामंडळाला तोट्यातुन बाहेर काढण्याची परिवहन मंत्री ना प्रताप सरनाईक यांची प्रामाणिक इच्छा असेल तर.

१) एसटी ला डिझेल वर आकारण्यात येणाऱ्या करात सुट द्यावी.

२) टोल टॅक्स माफ करावा.

३) स्पेअर पार्टसह इतर वस्तूवर आकारण्यात येणारा जीएसटी कर माफ करावा.

४) अर्थ संकल्पात एसटी साठी भारीव आर्थिक तरतूद करावी.

५) खाजगीकरण आणि भाडे तत्वाच्या विळख्यातून एसटीला मुक्त करावे.

६) एसटीला स्वमालकीच्या इलेक्ट्रीक बस शासनाने द्याव्या..

७) स्वमालकीतुन एसटीच्या जागा विकासीत करून अचलनिय उत्पन्न वाढवण्यावर भर द्यावा.

८) प्रवासी सवलत मुल्याची संपूर्ण परिपुर्ती वेळेवर महामंडळाला द्यावी.

या उपाययोजना केल्या तर एसटीला सोन्याचा पत्रा लागायला वेळ लागणार नाही. सर्व सामान्य जनतेची एसटी आता लोकप्रतिनिधींसाठी उत्पन्नाचे साधन बनली तर एसटीचा तोटा अधिकाधिक वाढत जाणार यात शंका नाही.

एसटीच्या माध्यमातून राज्यातील प्रवासी जनतेला सुरक्षित, किफायतशीर, विश्वासनिय प्रवास सेवा देण्याची राज्य शासनाची जबाबदारी आहे. एसटी महामंडळ हे नफा कमवण्याचे माध्यम नाही. राज्यातील प्रवासी जनतेला प्रवासी सेवा देण्यात एसटी महामंडळ नफ्या तोट्याचा विचार करत नाही. बसमध्ये एक प्रवासी असला तरी त्याला त्याच्या ऐच्छिक स्थळी पोहचवण्याचे काम एसटी करते. एसटीच्या नफा आणि तोट्याची संपूर्ण जबाबदारी शासनाची आहे. शासनाने आजपर्यंत ही जबाबदारी स्वीकारलेली नाही. म्हणून एसटी महामंडळ आर्थिक संकटात सापडले आहे.


महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे

राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

स्वराज्यदुत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान... स्वराज्याचा मान !!

महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये

कौतुक तुमच्या कार्याचे

उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!
SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत dainikswarajyadoot@gmail.com या इ-मेल वर पाठवायचा आहे.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
8446673677 / 8010232449


## पंढरपूर यात्रोत्सवासाठी जिल्ह्यातून जादा बससेवा

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------



पंढरपूर येथे आषाढी यात्रोत्सवासाठी जाणाऱ्यांची गर्दी पाहता राज्य परिवहन महामंडळाच्या नाशिक विभागातर्फे दोन ते ११ जुलै या कालावधीत ३०० जादा बससेवेचे नियोजन करण्यात आले आहे. पंढरपूर येथे दोन ते ११ जुलै या कालावधीत आषाढी एकादशीनिमित्त यात्रोत्सव होणार आहे. पंढरपूरमध्ये राज्याच्या कानाकोपऱ्यातून मानाच्या दिंड्या विठुरायाच्या दर्शनासाठी दाखल होतात. उत्सव काळात भाविकांसह वारकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होते. सहा जुलै रोजी आषाढी एकादशी तसेच १० जुलै रोजी गुरूपौर्णिमा आहे. या अनुषंगाने पंढरपूर येथे जाण्यासाठी नाशिक विभागातून ३०० जादा बससेवेचे नियोजन करण्यात आले आहे. नाशिक आगार क्रमांक एकमधून अहिल्यानगर, करमाळामार्गे, मालेगावातून शिर्डी, अहिल्यानगरमार्गे, सटाण्याहून मनमाड, अहिल्यानगरमार्गे तसेच देवळा, मनमाडमार्गे, कळवणमधून मनमाडमार्गे, मनमाडहून अहिल्यानगरमार्गे तसेच चांदवडमार्गे, येवल्याहून अहिल्यानगरमार्गे, लासलगांवहून कोळपेवाडी, शिर्डीमार्गे, पिंपळगावहून नाशिक, अहिल्यानगरमार्गे, नांदगावहून येवलामार्गे, सिन्नरहून अहिल्यानगरमार्गे, इगतपुरीहून नाशिकमार्गे, पेठहून नाशिकमार्गे, याप्रमाणे बससेवा राहणार आहे. प्रवाशांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

सम्पादकीय

# हुंडाबळी एक लज्जास्पद विकृती...

मुलींकडून हुंडा का मागितला जातो? याची मानसशास्त्रीय कारणे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. लोभ आणि अतृप्त गरजा असणारे कुटुंब. काही व्यक्ती आणि कुटुंबांमध्ये लोभ आणि भौतिक वस्तूंची अतृप्त लालसा असते. हुंड्याच्या माध्यमातून अधिक संपत्ती, वस्तू किंवा रोख रक्कम मिळवण्याची त्यांची अपेक्षा असते. ही एक प्रकारची मानसिक विकृती असू शकते, जिथे त्यांना इतरांच्या भावनांपेक्षा स्वतःचा स्वार्थ महत्त्वाचा वाटतो. सामाजिक प्रतिष्ठा आणि तुलना याला आवास्तव महत्त्व काही कुटुंबात दिले जाते. समाजात काही ठिकाणी हुंडा घेणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. 'अमुक कुटुंबाला एवढा हुंडा मिळाला' अशा प्रकारच्या तुलनेतून आणि सामाजिक दबावातून हुंड्याची मागणी केली जाते. ही एक प्रकारची न्यूनगंड किंवा स्वतःला श्रेष्ठ दाखवण्याची विकृत भावना असते.

पुरुषांचे वर्चस्व आणि महिलांना दुय्यम स्थान ही मानसिकता अशा घटनांना कारणीभूत ठरते. ज्या समाजात पुरुषांना श्रेष्ठ आणि महिलांना दुय्यम स्थान दिले जाते, तिथे हुंड्याची प्रथा अधिक घट्ट रुजलेली दिसते. मुलाला 'कमावता' आणि मुलीला 'खर्चिक' मानले जाते. त्यामुळे मुलीच्या कुटुंबाकडून तिच्या लग्नात 'भरपाई' म्हणून हुंडा मागितला जातो. ही एक लिंगभेदावर आधारित विकृत मानसिकता आहे. परंपरा आणि रूढींचे अंधानुकरण यातून आजही समाज बाहेर यायला तयार नाही. अनेक कुटुंबांमध्ये हुंडा देणे-घेणे हे परंपरेचा भाग मानले जाते. 'आमच्या कुटुंबात असेच चालत आले आहे' असे म्हणून याचे समर्थन केले जाते. यामागे कोणताही तर्क नसतो, आधार नसतो केवळ अंधानुकरण असते. सर्वात कहर म्हणजे मुलाच्या शिक्षणावर झालेला खर्च वसूल करण्याची वृत्ती देखील हुंडा मागण्यासाठी कारण ठरत आहे. काही पालक आपल्या मुलाच्या शिक्षणावर आणि संगोपनावर झालेल्या खर्चाची वसुली म्हणून हुंड्याची मागणी करतात. ही एक प्रकारची व्यापारी वृत्ती आहे, मुलावर जितके पैसे गुंतवले गेलेत त्यातून तो आजमितीला जे काही कामावतोय, जे आयुष्य, राहणीमान जपतोय त्यात त्याची पत्नी पण सहभागी होणार आहे तर तिला हे सर्व फुकटात का मिळावं? अशी मानसिकता अनेकांना हुंडा मागायला प्रवृत्त करते. या ठिकाणी मानवीय संबंधांपेक्षा आर्थिक व्यवहार महत्त्वाचा ठरतो.

हुंड्यासाठी मुलींना मानसिक आणि शारीरिक त्रास का दिला जातो? याचा विचार केल्यास लक्षात येते की, अपेक्षाभंग आणि निराशा. जेव्हा मनासारखा किंवा अपेक्षेप्रमाणे हुंडा मिळत नाही, तेव्हा काही कुटुंबे मुलीचा आणि तिच्या कुटुंबाचा छळ करण्यास सुरुवात करतात. त्यांच्या अपेक्षा पूर्ण न झाल्याने त्यांच्या मनात निराशा आणि राग निर्माण होतो, जो ते मुलीवर शारीरिक आणि मानसिक अत्याचार करून काढतात. वर्चस्व गाजवण्याची वृत्ती हा स्वभावातील दुर्गुण नव्या नवरीला त्रास द्यायला कारणीभूत असतो. सासरच्या मंडळींना नवीन आलेल्या सुनेवर आपले वर्चस्व गाजवायचे असते. हुंड्याच्या मागणीतून आणि त्यासाठी छळ करून ते तिला आपल्या नियंत्रणाखाली ठेवण्याचा प्रयत्न करतात. सासरच्या लोकांच्या मनातील असुरक्षिततेची भावना हे देखील मुख्य कारण हुंडा मागण्यासाठी कारणीभूत असते. काही वेळा सासरच्या मंडळींमध्ये, विशेषतः सासू किंवा नणंदेमध्ये, नवीन सुनेबद्दल असुरक्षिततेची भावना असू शकते. आपल्या मुलाचे किंवा भावाचे प्रेम आणि लक्ष विभागले जाईल या भीतीने ते सुनेचा छळ करतात आणि हुंडा हे त्याचे एक निमित्त बनते. आता आलेली नवीन सून आपल्या मुलाला आपल्यापासून दूर करेल, त्याला वेगळं काढेल, तो आपल्याला विचारणार नाही असे अनेक गैरसमज मनात बाळगल्यामुळे सुनांना मानसिक त्रास दिला जातो. सामाजिक दबावाचे बळी ठरणारे कुटुंब, ज्यांना स्वतःची स्पष्ट मत अथवा स्वतंत्र विचार धारा आणि निर्णय घेण्याची ताकद नाही त्यांना समाजाच्या किंवा नातेवाइकांच्या दबावामुळे सासरची मंडळी हुंड्यासाठी तगादा लावतात किंवा छळ करतात, जरी त्यांची तशी मूळ इच्छा नसली तरी ते हुंडा घ्यायला द्यायला तयार होतात. हुंड्यामुळे होणाऱ्या त्रासातून विवाहित महिला आत्महत्या का करतात? यामागील मानसशास्त्रीय कारणे पाहिली तर लक्षात येते की, असह्यता आणि निराशा! सततचा शारीरिक आणि मानसिक छळ सहन केल्याने महिलेला प्रचंड असह्यता आणि निराशा येते. तिला असे वाटू लागते की या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग नाही. एकटेपणा आणि आधाराचा अभाव यामुळे जेव्हा महिलेला तिच्या माहेरच्यांकडून किंवा मित्र-मैत्रिणींकडून पुरेसा आधार मिळत नाही, तेव्हा ती अधिक एकटी पडते.

हुंडा ही एक अत्यंत गंभीर सामाजिक समस्या आहे, ज्यामुळे अनेक महिलांना शारीरिक आणि मानसिक त्रासाला सामोरे जावे लागते आणि काही वेळा त्यांना आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलावे लागते. या समस्येची मानसशास्त्रीय कारणे, आत्महत्येमागील कारणे आणि यावर काय उपाययोजना करता येतील, तसेच यासाठी कोणते कायदे अस्तित्वात आहेत, याची सविस्तर माहिती आपण या लेखात पाहणार आहोत.

# जि.प. प्राथमिक शाळा देउटोला येथे स्वच्छ भारत मिशनच्या कामात भ्रष्टाचाराचा वास?

## शौचालयाचे निकृष्ट काम, शाळेचा गेट ठेकेदाराने फोडला – पालक संतप्त सरपंच, अभियंता, ठेकेदारांची 'मिळीभगत' उघड?

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत
--------------------------

गोरेगाव तालुक्यातील म्हसगाव ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या देउटोला जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील स्वच्छ भारत मिशनच्या अंतर्गत उभारण्यात आलेल्या शौचालयाच्या कामावरून मोठा वाद पेटला आहे. काम निकृष्ट, अपूर्ण, धोकादायक असून गावकरी, पालक आणि शाळा व्यवस्थापन समिती संतप्त झाले आहेत. गेट तोडणं, निकृष्ट मटेरियल, अपूर्ण गटर – शिक्षण मंदिराची फजिती! मुख्याध्यापक ओ.एल. कवरे यांनी स्पष्ट आरोप केला आहे की, "ठेकेदाराने काम करताना शाळेच्या मुख्य गेटवर भरलेलं लोडेड वाहन आदळवलं आणि गेटची मोडतोड केली. त्यानंतर वारंवार सांगूनही आजपर्यंत गेट किंवा कंपाउंड दुरुस्त केला नाही. हे शिक्षण मंदिर नव्हे का? मग ही अशी वागणूक?" शौचालयात पाण्याची सोय नाही, आतील बांधकाम धोकादायक काम नोव्हेंबर २०२४ मध्ये सुरू झालं होतं. सात महिने झाले तरी काम पूर्ण नाही! गटर उथळ आणि अपूर्ण कच्च्या विटा, हलकं लोखंड, वेल्डिंग नाही, आतील भाग पावसात धोकादायक ,पाणीपुरवठा यंत्रणा




नसलेली शौचालयं गावकऱ्यांचा आरोप – "ही मिळीभगत आहे!"

गावकऱ्यांनी ठणकावून सांगितलं की, "सरपंच, अभियंता व ठेकेदार यांच्यात स्पष्ट मिलीभगत असून काम झाकण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत." तक्रारी करूनही कोणतीही कारवाई झालेली नाही. बबई केंद्र प्रमुख म्हणाल्या: "मी शाळेला भेट देईन आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करीन." पण अद्याप कोणतीही कारवाई नाही. ₹६ लाखाचा खर्च – पण जमिनीवर धुळीला टेकलेलं काम!

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत शाळेसाठी ₹१.५ ते ₹३ लाख योजना येते. पण येथे ₹६ लाख खर्च दाखवून भ्रष्टाचाराचा मोठा प्रकार घडला आहे. ठेकेदाराचे बिल पास झाले का? बिलाआधीच भ्रष्टाचाराचे बिंग फोडले जात आहे का? हे मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत.

गावकऱ्यांची ठाम मागणी – चौकशी आणि गुन्हा दाखल करा! १. संबंधित ठेकेदारावर गुन्हा दाखल करा

२. अभियंता, सरपंच आणि पंचायत समिती अधिकाऱ्यांची चौकशी करा

३. संपूर्ण कामाचा लेखा-जोखा व ऑडिट करा

४. जिल्हाधिकारी आणि मुख्य सचिवांनी तात्काळ चौकशी समिती नेमावी

५. SBM नोडल अधिकारी आणि BDO यांनी जबाबदारी स्विकारावी उपस्थित लोकांची नावे – गाव एकवटले! शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीरामजी ठाकरे, सदस्य गणराज शेंद्रे, प्रकाश शेंद्रे, आशिष तुमडाम, चूनीलाल शेंद्रे, अनिल शहारे, विनोद शेंद्रे, सुनील शहारे, कुसुमा ठाकरे, सरिताबाई शेंद्रे, पुणेस्वरी, सोनटक्के, राजू कुमार टेंभुर्णीकर, मीराबाई तुमडाम यांच्यासह संपूर्ण गाव उपस्थित होता.

जर उद्या एखाद्या विद्यार्थ्यावर दुर्घटना घडली, तर जबाबदार कोण? शासन, प्रशासन आणि ग्रामपंचायतचे डोळे केव्हा उघडणार?

स्वच्छ भारत मिशनची 'अशुद्ध' हकीकत गावागावात उघड होत आहे.

# श्रीमती विमलबाई पाटील महाविद्यालय साक्री येथे "एक पेड मा के नाम" अभियानाला सुरुवात; पर्यावरण संर्वधनासाठी वृक्षारोपन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
--------------------------



दि २५ जुन रोजी श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व कै डॉ भास्कर सदाशिव देसले विज्ञान महा साक्री येथिल रासेयो एककाच्या वतिने ५ जुन जागतिक पर्यावरण दिवसा निमित्ताने विद्यापिठाच्या आदेशान्वये ५ जुन ते ३० जुन या कालावधीत एक पेड मॉ के नाम या अभियाना राबविण्याचे आव्हान केले होते . त्याअनुषंगाने आमच्या रासेयो एककाच्या वतिने आज महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्ष लागवड करून एक पेड मॉ के नाम अभियानाला महाविद्यालयात सुरवात केली . याप्रसंगी महा . प्राचार्य डॉ पी एस सोनवणे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते त्यांनी आपल्या मनोगतात रासेयो स्वयंसेवकांना आव्हान केले की आपण वृक्ष लागवड नियमित करत राहावेत . ग्रामिण भागात काही आपल्या या अभियानाची टिका सुद्धा करू शकतात मात्र आपण या नकारात्मक उर्जाकडे लक्ष न देता सकारात्मकतेने हे कार्य करावे व जेथे जेथे शक्य होईल तेथे आपण आईच्या , भावाच्या , वडीलाच्या , बहिनीच्या नावाने वृक्ष लागवड करून ते संवर्धन सुद्धा करायचे वडासारखे झाड अमर असते आपण भविष्यात येणाऱ्या पिढीला अभिमानाने सांगू की हे वडिलांच्या नावाने झाड मी लावले आहे त्या वृक्षामध्ये आपले प्रेमाची व्यक्ती सातत्याने आपल्यासमोर दिसत राहील म्हणून आजपासून महाविद्यालयाच्या वतीने एक पेड परिवारातील सदस्यांच्या नावाने लागवड करायची अभियान आपण राबवत आहोत तरी यात सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करण्याविषयी आव्हान व्यक्त केले . सदर कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी डॉ करुणा अहिरे यांनी केले तर प्रास्तविक कार्यक्रम अधिकारी डॉ अभिजित भामरे यांनी केले तर या कार्यक्रमाचे आभार डॉ अजय नांद्रे यांनी मानले .

# भारताचे वैद्यकीय क्षेत्र लवकरच कोलमडणार

किशोर सोनवणे
दैनिक स्वराज्यदूत
----------------------



अलीकडेच भारताच्या संसदीय समितीने संशोधन अहवालानुसार असे सांगितले की, भारतात सुमारे ४४% मानवी शस्त्रक्रिया बोगस, फेक किंवा अनावश्यक गरज नसतानाही केल्या जातात, याचा अर्थ, हॉस्पिटल्समध्ये केल्या जाणाऱ्या जवळ जवळ अर्ध्या शस्त्रक्रिया फक्त रुग्णाचे किंवा शासनाचे पैसे लुबाडण्यासाठी केल्या जातात याच रिपोर्टमध्ये पुढे वर्गीकरण करून सांगितले आहे की, भारतात केल्या जाणाऱ्या ५५ % हृदयाच्या शस्त्रक्रिया फेक किंवा बोगस असतात, ४८% हिस्टेरोक्टोमी (गर्भाशय काढण्याची शस्त्रक्रिया), ४७% कॅन्सर सर्जरी, ४८% गुढघे प्रत्यारोपण, ४५% सिझेरियन (कृत्रिम प्रसूती), खांदेरोपण, स्पाईन सर्जरी ई. महाराष्ट्रातील अनेक नामांकित हॉस्पिटल्स मध्ये केलेल्या पाहणीमध्ये आढळून आले आहे की, मोठ्या हॉस्पिटल्समध्ये सिनिअर डॉक्टरचे वेतन महिन्याला एक कोटी रुपयांपर्यंत दिले जाते, याचे कारण जास्तीत जास्त रुग्णांना गरज नसतांना अधिक तपासण्या, उपचार, एडमिट करणे आणि शस्त्रकीया करायला भाग पडणाऱ्या डॉक्टरांचे वेतन अधिक असते, (बी . एम. जे. ग्लोबल हेल्थ नुसार ) मृत रुग्णांना जिवंत दाखवून त्यांच्यावर उपचार करण्याच्या असंख्य केसेसचा अभ्यास करून टाइम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्राने एक रिपोर्ट प्रकाशित केला आहे की रुग्णांकडून जास्त पैसे उकळण्यासाठी केला जाणारा हा अत्यंत घृणित प्रकार आता अनेक ठिकाणी उघडकीस आला आहे एका नामांकित हॉस्पिटलमध्ये १४ वर्षाच्या एक मृत युवकाला जिवंत आहे असे सांगून सुमारे एक महिना व्हेंटिलेटर वर ठेवून उपचार केले आणि शेवटी मृत घोषित केले, तक्रार केल्यावर हॉस्पिटल दोषी असल्याचे आढळून आले, हॉस्पिटलने तोडगा म्हणून पाच लाख रुपये कुटुंबाला दिले परंतु एक महिना कुटुंबीयांवर जो मानसिक अत्याचार करण्यात आला त्याचे काय? अनेक वेळा मृत रुग्णांवर त्वरित शस्त्रक्रिया करण्याचा बनाव केला जातो त्यासाठी मृत रुग्णाच्या कुटुंबियांना तत्काळ पैसे भरण्यास सांगितले जाते नंतर रुग्ण शस्त्रक्रिया करतांना मरण पावल्याचे जाहीर केले जाते, भरलेले पैसे आणि शस्त्रक्रियेची मोठी रक्कम वसूल केली जाते, तसेच इंश्युरंस म्हणजे मेडिक्लेमचा घोटाळा सुद्धा असाच भयंकर आहे, भारतात सुमारे ६८% लोकांनी मेडिक्लेम इंश्युरंस घेतलेला असतो परंतु जेव्हा गरज पडते तेव्हा अनेक क्लुप्त्या करून रुग्णांना इन्शुरन्स क्लेम नाकारला जातो किंवा अंशिक रक्कम दिली जाते बाकी सर्व खर्च रुग्णांच्या नातेवाइकांना करावा लागतो, इंश्युरंसचे खोटे क्लेम करणाऱ्या सुमारे तीन हजार नामांकित हॉस्पिटल्सना मोठ्या इंश्युरंस कंपन्यांनी काळ्या यादीत टाकले आहे, कोरोना काळात अनेक मोठ्या हॉस्पिटल्सनी कोरोनाच्या खोट्या केसेस दाखवून इंश्युरंस कंपन्यांना चुना लावल्याचे असंख्य प्रकार उघडकीस आले होते त्याचबरोबर मानवी अंगांची तस्करी हा एक अतिशय घृणित व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो, इंडियन एक्सप्रेसने २०१९ मध्ये या संबंधी एक हृदयद्रावक घटना समोर आणली होती हजारो कोटी रुपयांचा हा धंदा कसा चालतो ते बघा, संगीता कश्यप या कानपूरच्या महिलेला नामांकित कंपनीत नोकरी देण्यासाठी दिल्लीला येण्याची सूचना केली जाते कंपनीमध्ये नोकरी अगोदर त्या महिलेचे संपूर्ण हेल्थ चेकअप करण्यासाठी दिल्लीतील अत्यंत नामांकित फोर्टिस हॉस्पिटलला जाण्याची सूचना केली जाते सांगिताला रितसर रुग्णालयात भरती करण्यात आले, परंतु सुदैवाने शेजारच्या खोलीत डॉक्टरांचे डोनर वगैरे बोलणे तिच्या लक्षात आल्यावर तीने तिथून पळ काढला, ज्या मित्राने तिला हॉस्पिटलला नेले होते त्याला हा प्रकार सांगितल्यावर उलट त्याने सांगिताला धमकाविले आणि ५० हजार रुपये मागू लागला, तिने या प्रकरणाची पोलिसांकडे तक्रार केली, पोलिसांनी तपासणी अंती एका मोठ्या हजारो कोटी रुपयांच्या अवयव तस्करी करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीचा पर्दाफास झाला, पोलिसांनी आपल्या अहवालात नमूद केले आहे की, या प्रकरणात पोलीस, डॉक्टर्स, मेडिकल स्टाफ, मेडिकल सपोर्ट स्टाफ सर्वजण सामिल होते.

'हॉस्पिटल रेफरल स्कॅम' हा तर सर्वांना माहित असलेला आणि सर्रास चालणार प्रकार आहे, आपला परिचित किंवा इतर कोणताही डॉक्टर रुग्णाला गंभीर आजार आहे असे सांगून मोठ्या नामांकित हॉस्पिटलला एडमिट होण्यास सांगतात, अपोलो, फोर्टिस, अपेक्स इ. अनेक हॉस्पिटलचे नावे आपणास ठाऊकच असतील, असे हॉस्पिटल्स डॉक्टर साठी रेफरल ट्रेनिंग प्रोग्राम घेतात, मुंबईतील असे अनेक हॉस्पिटलने तर वार्षिक ४० रुग्ण पाठविण्यासाठी एक लाख रुपये, ५० रुग्णासाठी दीड लाख रुपये, ७५ रुग्णासाठी अडीच लाख रु.

देण्याचे लिखित स्वरुपात जाहीर केले होते रुग्णाला काही झालेले असो अगर नसो फक्त रुग्ण पाठविण्याची रक्कम डॉक्टरच्या बँक खात्यात जमा केली जाते, 'डायग्नोसिस स्कॅम' हा अत्यंत सरळ आणि सोपा कोट्यावधी रुपयांच्या लुटीचा प्रकार आहे, बंगुलुरू येथील काही नामांकित पेथोलॉजी लॅब वर इन्कम टॅक्स विभागाच्या धाडीमध्ये अनेक लॅब कडे १०० कोटीच्या वर रुपये कॅश आणि साडेतीन किलो सोने आढळून आले होते, पुढे असे आढळून आले की, डॉक्टरांना देण्यासाठी ते ठेवण्यात आले होते रुग्णाला काही झाले असो किंवा नसो डॉक्टर्स रुग्णांना चेकअप साठी पाठवितात. तिथून त्यांना ४०– ५०% कमिशन मिळते, जबरदस्ती केलेल्या या चेकअप मधील १ ते २ तपासण्या करून बाकी सर्व रिपोर्ट हेराफेरी करून दिले जातात, हा धंदा तर फारच नफेखोरीचा आहे. त्यामुळेच देशात सुमारे दोन लाखाच्या वर लॅब कार्यरत आहेत, परंतु यातील फक्त एक हजारावर लॅब प्रमाणित आहेत.

असाच एक मोठा स्कॅम फार्मा कम्पन्या सुद्धा चालवितात, देशातील २० ते २५ मोठमोठ्या औषधी कंपन्या डॉक्टरांवर एक-एक हजार कोटी रुपये दरवर्षी खर्च करतात, डोलो गोळी विकणाऱ्या कंपनीने डॉक्टरांना एक हजार कोटी रुपये दिल्याचे उदाहरण कोरोना काळात जगजाहीर झाले आहे, डॉक्टरने आपल्या कंपनीचे औषध लिहावे म्हणून त्यांना लाखो रुपये कॅश, विदेश दौरा, पंचतारांकित हॉटेलमध्ये ५ ते ७ दिवसांचे वास्तव्य ई. आणि प्रत्येक डॉक्टरला ३ लाख रु. कॅश ऑस्ट्रेलिया किंवा अमेरिका ट्रिप देते, हॉस्पिटल्स आणि फार्मा कंपन्याचे एक वेगळे स्कॅम आणखी आहे, अनेक फार्मा कंपन्या मोठ्या हॉस्पिटल्सना औषधी, सर्जिकल साहित्य अत्यंत कमी दरात उपलब्ध करून देतात. त्यावर किंमत मात्र प्रचंड असते, इंडिया टुडेने याचा पुरावा देत सिद्ध केले आहे. एम्कुरे कंपनी आपले टेमीक्युअर हे कॅन्सरचे औषध हॉस्पिटलना १९५० रुपयांना देते, हॉस्पिटल्स मात्र रुग्णाकडून या औषधाचे १८६४५ रुपये वसूल करतात, यात सर्व हॉस्पिटल्स सामील आहेत. (इंडिया टुडे हॉस्पिटल स्कॅम सर्व्हे रिपोर्ट नुसार ) मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया (MCI) ही डॉक्टर आणि हॉस्पिटल्स वर नियंत्रण ठेवणारी देशातील सर्वोच्च संस्था आहे, २०१६ मध्ये केंद्र सरकारने या संस्थेच्या कार्यप्रणालीची चौकशी करण्यासाठी एक समिती नियुक्त केली या समितीने आपल्या अहवालात स्पष्ट नमूद केले आहे की, MCI नवीन मेडिकल कॉलेजला परवानगी देण्यात खूप उत्सुक असते मात्र डॉक्टर आणि हॉस्पिटल्स वर नियंत्रण करण्यात हेतुपुरस्सर दुर्लक्ष करीत आहे.

देशातील डॉक्टर MCI च्या नियमांची रोज पायमल्ली करतात, परंतु याची जनतेला कल्पना नसते.

उदाहरणार्थ

१. डॉक्टरने कोणत्याही कंपनीचे ब्रान्डेड औषध लिहायचे नसून साल्टचे जेनेरिक नाव लिहिले पाहिजे.

२. क्ला◌ॅज १.८ नुसार उपचार करण्या आधी डॉक्टरने आपली संपूर्ण फी सांगितली पाहिजे, इ. अनेक नियमांचे उल्लंघन रोज केले जाते.

३. तपासण्या आणि उपचार करण्यापूर्वी रुग्णाला योग्य माहिती देऊन त्याची स्विकृती घेणे आवश्यक आहे.

४. प्रत्येक रुग्णाचे मेडिकल रेकॉर्ड येणाऱ्या ३ वर्षांसाठी डॉक्टरने सुरक्षित ठेवले पाहिजे.

५. व्यवसायातील भ्रष्ट, अनैतिक, अप्रामाणिक आणि अक्षम डॉक्टरांचे वर्तन कोणतीही भीती न बाळगता समाजासमोर आणले पाहिजे.

६. शासकीय योजनांचा स्कॅम हा नवीन आणि अफलातून प्रकार तर हल्ली हजारो कोटींचा झाला आहे. माजी सैनिक हॉस्पिटलला गेला की, त्याला फक्त सर्दी किंवा इतर किरकोळ समस्या असेल तरीसुद्धा एडमिट केले जाते, त्याच्या कार्डवरून त्याच्या नकळत एखाद्या सरकारी योजनेत बसविले जाते, रुग्णावर नको ते उपचार करण्याचा देखावा केला जातो, ७/८ दिवसात सुटी दिली जाते, तोपर्यंत त्याचे लाखोंचे बिल सरकारी योजनेतून भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या कृपेने डॉक्टरच्या खात्यात जमा झालेले असते, अर्थातच खोट्या चेकअप आणि तपासण्याचा, उपचारांचा कागदोपत्री आधार याला द्यावा लागतो हा मेसेज प्रत्येक नागरिकांपर्यंत पोहोचला पाहिजे, जेणेकरून आपण व आपले कुटुंब यापासून वाचायला हवे

# थायलंड आणि सांस्कृतिक पर्यटन

थायलंडच्या बँककॉक शहरात एका आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्समध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली, त्यात विविध देशांतील प्रतिनिधी, आधुनिक विषयांवर चर्चा आणि नवनवीन तंत्रज्ञानाची ओळख होणार होती, हे सर्व अनुभव माझ्यासाठी खूपच समृद्ध करणारे ठरले,

बँककॉक शहराबद्दल अनेक प्रकारची मतं असली, तरी प्रत्यक्ष अनुभवताना मला जाणवले की हे शहर केवळ "रेड लाईट एरिया" म्हणून ओळखले जाण्याइतकेच मर्यादित नाही यामागे खोल सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि धार्मिक परंपरांचाही खजिना दडलेला आहे, सांस्कृतिक पर्यटन स्थळांचा समृद्ध अनुभव: ग्रँड पॅलेस: थायलंडच्या राजघराण्याचा वैभवशाली इतिहास येथे पाहायला मिळतो त्याचबरोबर मंदिरातील सजावट, सोनेरी बुद्धमूर्ती आणि आकर्षक वास्तुकला याने मन मंत्रमुग्ध झाले , वॉट अरण चाओ फ्राया नदीच्या किनाऱ्यावर असलेले हे मंदिर सूर्यास्ताच्या वेळी पाहताना एक वेगळ्याच जगात गेल्यासारखं वाटतं, फ्लोटिंग मार्केट आणि लोकल स्ट्रीट फूड अनुभवताना त्या देशाची खरी संस्कृती आणि लोकजीवन कळले, जगभरातून आलेल्या लोकांसोबत संवाद साधताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली शिक्षण, महिलांचा सहभाग आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य या विषयांवर सर्वांचं लक्ष केंद्रीत होतं, थायलंडचे सौंदर्य, त्यांची साधी जीवनशैली आणि शिस्तबद्ध व्यवस्था



पाहून अनेक गोष्टी शिकाव्या वाटल्या, माझ्यासाठी ही फक्त कॉन्फरन्स नव्हे, तर स्वतःला समृद्ध करण्याची एक संधी होती, थायलंडमध्ये रामायणाची छाया: बँककॉकमध्ये फिरताना एक गोष्ट लक्षात आली, रामाची संस्कृती अजूनही तेथे जिवंत आहे, थायलंडमध्ये रामायणाचे "रामाकेन" हे स्थानिक रूप अजूनही अत्यंत श्रद्धेने आणि आदराने स्वीकारले जाते, मंदिरांमधील चित्रशैली, शासकीय कार्यक्रमांतील पोशाख, नृत्य-नाट्य आणि स्थानिक परंपरा यामध्ये श्रीराम, सीता, हनुमान यांची मूर्ती, कथा आणि संस्कार यांचे प्रतिबिंब दिसते, वॉट फ्रा केव हे मंदिर 'एमराल्ड बुद्धा'साठी प्रसिद्ध असले, तरी त्याच्या आजूबाजूला असलेल्या भिंतींवर रामायणाची सुंदर चित्रं आहेत, जणू काही भारताबाहेर रामायणाचा एक जीवंत संग्रहालयच!

थायलंडचे मूळ नाव "सियाम" असले तरी त्यांचा धार्मिक आणि सांस्कृतिक पाया भारतीय संस्कृतीशी खूपच जवळचा आहे. त्यामुळे भारतातील एक प्रवासी म्हणून ही गोष्ट विशेष अभिमानाची आणि भावनिक वाटली, थायलंडमध्ये आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्समध्ये सहभागी होत असताना अनेक गोष्टी अनुभवायला मिळाल्या, त्यापैकी एक विशेष जाणवलेली गोष्ट म्हणजे "जशी दृष्टी तशी सृष्टी",

बँककॉक शहरामध्ये काही परिसर रेड लाइट एरिया म्हणून ओळखले जातात, अनेकांचे लक्ष या भागांच्या नकारात्मक बाजूकडे जाते, पण माझा अनुभव काही वेगळा होता माझी दृष्टी आधीच ठरलेली होती सकारात्मकतेची, शोध घेणारी आणि समजून घेणारी त्यामुळे मी त्या परिसरातसुद्धा काही सकारात्मक गोष्टी पाहिल्या स्थानिकांचे प्रामाणिकपण, पर्यटन व्यवसायात महिलांचा स्वाभिमानपूर्वक सहभाग, स्वच्छता, शिस्तबद्ध सेवा आणि सुजाण सामाजिक वागणूक विविधतेतून आलेली सहिष्णुता मला जाणवले की, जिथे लोक फक्त "गैरसोयी" शोधतात, तिथेही जर आपली दृष्टी शुद्ध असेल, तर " संवेदना, कष्ट, आत्मसन्मान आणि सौंदर्य" दिसू शकते,

हा अनुभव केवळ थायलंडपुरता मर्यादित राहिला नाही, तर जीवनाकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोन अधिक व्यापक आणि समजूतदार बनवून गेला.

----------------------------

लेखिका
सौ.पुनम विनोद कोकणे

----------------------

संकलन
किशोर सोनवणे
दैनिक स्वराज्यदुत

# २६ जून आंतरराष्ट्रीय नशा निषेध दिवस
# सावधान! कोणत्याही नशेच्या आहारी जाणे घातकच

दरवर्षी २६ जूनला जगभर आंतरराष्ट्रीय नशा निरोधक दिवस साजरा केल्या जातो.नशेली वस्तुंचे निवारण व्हावे या उद्देशाने संयुक्त राष्ट्र महासभेने ७ डिसेंबर १९८७ ला एक प्रस्ताव पारित केला व त्या अनुषंगाने युनोने १९८८ पासून दरवर्षी नशेली पदार्थांच्या सेवनाने होणाऱ्या दुष्परिणामाच्या प्रती समाजात जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने दरवर्षी २६ जूनला आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवस म्हणून साजरा केल्या जातो.सध्याच्या आधुनिक युगात नशेच्या सेवनाचे प्रमाण वाढल्याने नशेली पदार्थांचा वाममार्गाने मोठा व्यापार आपल्याला दिसुन येतो. कोणतीही नशा असो शरिराला व आयुष्याला घातकच आहे.कारण नशा हा शब्दच असा आहे की प्रत्येकांचे आयुष्य उद्ध्वस्त करतो मग ती कोणतीही नशा असो.त्यामुळे आजच्या युवा पिढीने नशेली पदार्थांपासून सावधान रहाणे अत्यंत गरजेचे आहे.कारण नशेली वस्तू युवावर्गापर्यत पोहोचविण्याचे काम तस्करीच्या माध्यमातून केले जाते.भारतात बांगलादेश, पाकिस्तान, नेपाळ, ईरान, अफगाणिस्तान मार्गे विदेशी तस्कर नशेली पदार्थ पुरविण्याचे काम करीत असतात.ड्रग्स पुरवठ्याचे जाळे तस्करीच्या माध्यमातून संपूर्ण जगभर विनल्या गेले आहे.भारतार दर महिन्याला अवैधरित्या आलेली करोडो रुपयांची ड्रग्स,एमडी पकडली जाते.तरीही युवावर्गामध्ये नशेचे प्रमाण अजूनही कमी झालेले नाही ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.मागीलवर्षी २२ जून २०२४ ला गुजरातच्या समुद्र किनाऱ्यावर बीएसएफ जवानांनी १५० करोड रुपयांची ड्रग्स पकडली ही ड्रग्स कच्छच्या क्रिक भागात लावारिस पडलेली सापडली. सरकारी माहितीनुसार या ड्रग्सचे तार ईरान व अफगाणिस्तानशी असल्याचे सांगण्यात आले होते.यावरून स्पष्ट होते की काही विदेशी असामाजिक तत्व भारतीय युवा पिढीला नेशेच्या खाईत लोटण्याचे काम करीत आहे.त्यामुळे आजच्या तरुण पिढीने व युवा वर्गाने नशेली पदार्थांपासून सावध रहाने अत्यंत गरजेचे आहे.कारण कोणतीही नशा ही महाघातक असते. कोणत्याही नशेपासुन शरिराला यत्किंचितही लाभ होत नाही;उलट त्याचे शरिरावर व परिवारावर मोठ्या प्रमाणात दुष्परिणाम होतांना दिसतात. सध्याच्या परिस्थितीत हॉटेल किंवा हुक्का पार्लर मधुन ड्रग्सचा पुरवठा होतो हेही लक्षात आले आहे. त्यामुळे अशा हॉटेलवर प्रशासनाकडुन कठोर कारवाई व्हायला हवी.अशाच पध्दतीने पबमध्ये सुद्धा ड्रग्सचा गोरखधंदा चालत असावा याला सुध्दा नाकारता येत नाही.यावर प्रशासनाने लक्ष केंद्रित केले पाहिजेत.देशात नशेली पदार्थांवर प्रतीबंध आहे. परंतु तस्करीच्या माध्यमातून अफीम, गांजा, भांग, कोकेन,हेरोइन,एमडी सारखे अंमली पदार्थ युवा पिढीपर्यंत वाममार्गाने पोहचवु त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करण्याचे काम असामाजिक तत्व वेळोवेळी करीत असतात.परंतु आजचा युवावर्ग जागृक आहे त्यांनी प्रत्येक नशेली पदार्थांपासून सावध रहाले पाहिजे व त्याचा कडाडून विरोध करायला पाहिजे. देशासह जगातील युवावर्गाने २६ जूनला शपथ घेतली पाहिजे की मी माझ्यासाठी, माझ्या परिवारासाठी व देशाच्या भविष्यासाठी यापुढे कोणतीही नशा करणार नाही तेव्हाच खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवस समजल्या जाईल.कारण ड्रग्सची नशा ही नशा करणाऱ्यांचे आयुष्याची छल्ली तर करतोच सोबतच परिवाराला असमंनजस्यतेमध्ये टाकुन संपूर्ण परिवार विस्कळीत होतो. यामुळे संपूर्ण घर उध्वस्त होते याचे मुख्य कारण म्हणजे फक्त नशा.त्यामुळे कोणतीही नशा म्हणजे आयुष्याचा शेवट ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवली पाहिजे.कोणतीही नशा असो ती शरीराचा विकास तर करीत नाहीच हालाकी शरिराला "छल्ली" व छिन्नविछिन्न करण्याचे काम करीत असते व स्लोपॉयझनचे काम करून मृत्युला जवळ करीत असते.आपण साधारणतः नशेली वस्तू व पोषक वस्तू यांचा विचार केला तर मनुष्यासाठी नशेली वस्तूंच्या तुलनेत पोषक वस्तू खुपचं स्वस्त असतात. त्यामुळे नशा करणाऱ्यांनी मनावर ताबा ठेवुन नशेली पदार्थांचा विरोध करावा व युवकांनीच जगाला संदेश देवुन नशेली पदार्थांचा निषेध केला पाहिजे. कोणत्याही नशेली वस्तुंसाठी रांगेत उभे रहाने म्हणजे "मृत्यूच्या रांगेत"उभे रहाल्यासारखे आहे. याची जानीव आजच्या युवा पिढीने लक्षात ठेवली पाहिजे. कोणीही कीतीही नशेली वस्तु देण्याचा प्रयत्न केला तरीही आपण जर आपल्या मनावर ताबा ठेवला तर कोणतीही नशेली वस्तु तुम्हाला स्पर्शसुध्द करू शकत नाही हेसुद्धा तेवढेच सत्य आहे.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत प्रत्येकांनी आपल्या आयुष्याची काळजी घ्यायला हवी.त्यामुळे कोणत्याही नशेपासुन सावधगिरी बाळगली पाहिजे.आपण सुदृढ रहालो तर आपली पिढी सुदृढ राहील" त्याचप्रमाणे "आपण सुरक्षीतरीत्या जगलो तर तर देश सुरक्षित राहील, देश सुरक्षित रहाला तर जग अवश्य सुरक्षित होईल.याकरीता अंमली पदार्थ विरोधी दिनाच्या निमित्ताने आपण "संकल्प" करूया की नशेली वस्तूला टाटा-बाय-बाय करू या.

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
नागपूर

# 'फुकट योजना संस्कृती' आणि अर्थव्यवस्थेचं वाटोळे

किशोर सोनवणे
दैनिक स्वराज्यदुत

----------------------

माय बाप सरकार प्रत्येकाला दोन वेळ चे जेवण, रायला घर आणि खिशात दोन पैसे मिळावे अश्या योजना राबवत आहे यात घरकुल योजना, लाडकी बहिण, लाडका भाऊ, मातोश्री योजना, मोफत अन्नधान्य, थेट खात्यात पैसे, महिला सन्मान योजना, शेतकरी सन्मान निधी,अशा 'फुकटखाऊ' योजना सढळ हाताने राबवते आहे, या धोरणांमुळे निर्माण झालेला आर्थिक असंतुलन आणि कामगारांचे काम न करण्याची वृत्ती या गोष्टी कडे सरकार डोळेझाक करत असून या मुळे राज्याचे आणि देशाचे फार मोठे नुकसान होणार आहे, मोफत अन्नधान्य आणि पैसे मिळत असल्यामुळे अनेक कष्टकरी आणि मजूर हाताला काम असताना ते करण्यास तयार नाहीत, "सरकार देणारच आहे" ही मानसिकता त्यांच्यात खोलवर रुजत आहे, परिणामी, शेतमालाची शेती असो वा इतर उद्यागधंद्यातील कामे, सर्वत्र मजूर टंचाईचा सामना करावा लागत आहे, जे काही कामास येतात, त्यांचे दरही गगनाला भिडले आहेत, दुप्पट ते तिप्पट मजुरी मागणारे हे मजूर त्यांच्या कामाच्या गुणवत्तेबाबत मात्र फारच हलगर्जी दिसतात, या सगळ्याचा थेट फटका शेती




व्यवसायाला, व्यापाऱ्यांना आणि लघुउद्योगांना बसतो आहे, उत्पादन खर्च वाढल्यामुळे वस्तूंचे दर वाढतात आणि महागाई अधिक उग्र रूप धारण करते, यामुळे शेतकरी आणि उद्योजक मात्र कर्जबाजारी होत चालला आहे, या साऱ्या परिस्थितीमध्ये सरकारला मात्र याचे फारसे काहीच वाटत नसल्याचे दिसते, कारण 'फुकट' योजना ही सध्या सत्तेवर राहण्याची नवी राजकीय रणनीती बनली आहे, मतदारांना सुखवायचं, त्यांची चंगळ चालू ठेवायची आणि त्याद्वारे निवडणुकांचे राजकारण जिंकायचे हेच राजकारण्यांनी अंगीकारला आहे असे दिसते आहे, याचा

परिणाम शासनाचा आर्थिक भार दिवसेंदिवस वाढतो आहे, विकासकामांसाठी निधी अपुरा पडतो आहे, महामंडळं तोट्यात चालली आहेत, कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर होत नाही, विविध विभागांच्या निधी वर्ग करण्याची नामुष्की सरकारवर येऊन ठेपले आहे, सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार त्यांचे पीएफचे पैसे, विविध महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचे पगार, सरकारी कर्मचाऱ्यांची देणे इत्यादी बाबत आर्थिक अडचणींमुळे विलंब होत आहे, केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या निधीवर राज्य सरकार अवलंबून आहे आणि त्यातही अडचणी येत आहेत, याचवेळी राज्यात बेरोजगारी दर वाढतो आहे, उच्च शिक्षित तरुणही रोजगाराच्या प्रतीक्षेत आहेत, महागाईचा भडका उडालेला आहे, मात्र सरकार या सगळ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करत, योजनेच्या जाहिरातींवर कोट्यवधी रुपये खर्च करत आहे, म्हणजे विकासाच्या नावाने सरकार लोकांना ऐतखाऊ बनवते आहे यातून सरकार कर्जबाजारी होत आहे, एवढेही त्यांना कळत नसेल का ? हा सामान्य प्रश्न सुज्ञ नागरिकाला पडतो, अर्थतज्ञ पण आता स्पष्टपणे सांगू लागले आहेत की ही 'फुकट योजना संस्कृती' दीर्घकालीन दृष्टिकोनातून अर्थव्यवस्थेला घातक आहे, कामगारच निष्क्रिय आणि सवलतींवर अवलंबून राहू लागले तर एक सामाजिक, आर्थिक विषमता निर्माण होईल यामुळे श्रमसंस्कृतीच नष्ट होत आहे, देशाचा कणा असलेला कामगार हतबल होतो आहे आणि मग संपूर्ण उत्पादन व्यवस्था कोलमडून पडेल,

आता तरी या विषयाकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे, गरिबांना मदत व्हायलाच हवी, पण ती मदत स्व: कष्टातून मोबदला स्वरूपाची असावी आणि 'स्वावलंबन' घडवणारी असावी, 'फुकट' देऊन त्यांची आत्मिक व आर्थिक सक्षमताच हिरावून घेणं हे कोणत्याही समतावादी राज्यघटनेला शोभत नाही, योजनेच्या नावाखाली मतांची खरेदी थांबवली नाही तर आज हेच लोक काम करणार नाहीत तर त्यांची मुलेही काम करणार नाहीत मग कुठे प्रगती आणि कुठे विकास सर्व अर्थव्यवस्थेचं वाटोळे करायचे आहे काय याचा प्रामुख्याने विचार सरकारने करायला पाहिजे.

# कृषी उद्योगा साठी मानसिकता महत्त्वाची –श्री भूषण निकम

## कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था रामेती, खोपोली तर्फे पाच दिवसीय कृषी उद्योग प्रशिक्षण संपन्न

किशोर सोनवणे
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------

कृषी उद्योगात यशस्वी होण्यासाठी सकारात्मक मानसिकता अत्यंत आवश्यक आहे, "जोपर्यंत आपण मनापासून कृषी क्षेत्रात काम करण्याची मानसिकता तयार करत नाही, तोपर्यंत उद्योगात यश मिळणे कठीण आहे," असे प्रतिपादन कृषी उद्योजक व प्रशिक्षक भूषण निकम यांनी केले. प्रादेशिक कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (रामेती), खोपोली यांच्या वतीने आयोजित पाच दिवसीय कृषी प्रशिक्षण कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमात कृषी उद्योग, शेतकरी उत्पादक कंपनीची स्थापना व व्यवस्थापन, शासकीय योजना यावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले.




भूषण निकम यांनी सांगितले की, " व्यवसायात ८० टक्के लोक अपयशी होतात यामागचं मुख्य कारण म्हणजे व्यवसायविषयक मानसिकतेचा अभाव." त्यामुळे उद्योग सुरू करण्याआधी मानसिकता विकास हे पहिले पाऊल असते, या वेळी रामेती तर्फे प्राचार्य श्रीम. उर्मिला राजपूत, सहाय्यक संचालक श्रीम. मंजुश्री भागवत, श्री. दीपक भोसले, आणि श्रीम. सुधा भणगे उपस्थित होत्या, या प्रशिक्षणात रायगड जिल्ह्यातील दहा शेतकरी उत्पादक कंपन्यांचे संचालक सहभागी झाले होते आणि त्यांनी विविध क्षेत्रांतील माहिती व कौशल्य आत्मसात केले.

# नांदेड तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

--------------------

नांदेड तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच पदाचे वर्ष २०२५ ते २०३० साठी आरक्षण सोडत १ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वा. तहसिल कार्यालय नांदेड (उपविभागीय अधिकारी नांदेड यांच्या बैठक कक्षात दुसरा मजला) येथे काढण्यात येणार आहे. सरपंच पदाचे आरक्षणात नांदेड तालुक्यात एकुण राखीव ७३ पदांपैकी ३७ महिलांसाठी राखीव पदे आहेत. सर्व संबंधीतानी तसेच माजी जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य यांनी या सोडतीस उपस्थित रहावे, असे आवाहन तहसिलदार नांदेड

नांदेड जिल्हाधिकारी यांची अधिसूचना २३ जून २०२५ नुसार नांदेड तालुक्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकाचा मागास प्रवर्ग आणि स्त्रिया यांच्यासाठी राखून ठेवावयाची सरपंचाची पदे मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ च्या नियम २ अ चे पोटनियम ३ व ४ अन्वये जिल्हाधिकारी नांदेड यांनी पुढील तपशिलानुसार अधिसूचीत करुन दिले आहे.

सरपंच पदाचे आरक्षण अनुसूचित जातीसाठी एकुण राखीव पद १८ त्यापैकी ५० टक्के महिलांसाठी राखीव ९, अनुसूचित जमाती १ पैकी महिलासाठी १, नागरिकांचा मागास प्रवर्ग एकुण राखीव पद २० पैकी महिलांसाठी १०, खुला प्रवर्ग एकुण राखीव पद ३४ पैकी ५० टक्के महिलांसाठी १७ राखीव ठेवण्यात आली आहेत.

आरक्षण हे सन २०२५ ते २०३० मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी अमलात राहील. सदर प्रवर्गाच्या सरपंच पदासाठी सोडत पद्धतीने तहसिल कार्यालय नांदेड (उपविभागीय अधिकारी नांदेड यांचे बैठक कक्ष, दुसरा मजला) येथे मंगळवार १ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वा. करण्यात येईल. सर्व संबंधीतानी असेही आवाहन तहसिलदार संजय वारकड यांनी केले आहे.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर , जाहिरात प्रतिनिधी , गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore





# पांझरा कान -साखर कारखाना पुनश्च सुरु होणार!

## आमदार मंजुळाताई गावित व डॉ. तुळशीराम गावित यांच्या पाठपुराव्याने मंत्रालयात बैठक पार पडली

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------



साक्री तालुक्यातील भांडणे येथील पांझरा कान सहकारी साखर कारखाना पुनश्च सुरू करण्याच्या दृष्टीने मंत्रालय मुंबई येथे उपमुख्यमंत्री श्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. त्यात कारखाना पुनश्च सुरू करण्या संदर्भात चर्चा करण्यात आली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधित विभागीय अधिकाऱ्यांना तात्काळ टेंडर प्रक्रिया राबविण्यासह सर्व आवश्यक कारवाई तातडीने करण्याचे निर्देश दिले. साक्री तालुक्याचे आमदार सौ मंजुळाताई गावित यांच्या पुढाकाराने व डॉ. तुळशीराम गावित यांच्या पाठपुरावाने ही बैठक पार पडली. बैठकीस सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, निफाडचे आ. दिलीप बनकर, डॉ. तुळशीराम गावित, अप्पर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, तसेच साखर आयुक्त दिलीप तावरे, सहकार वित्त विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पांझरा कान सहकारी साखर कारखाना हा साक्री तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. हा कारखाना सुरू व्हावा यासाठी आमदार गावित सातत्याने प्रयत्नशील आहेत. ही बाब पांजरा कान साखर कारखाना बचाव कृती समितीचे अध्यक्ष श्री डॉ.तुळशीराम गावित यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निदर्शनास आणून दिली. बैठकीदरम्यान कारखाना सुरू करण्यासाठी टेंडर प्रक्रिया तातडीने राबवावी, असे स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी अधिकाऱ्यांना दिले.

# मंजुळा ताई गावित यांचा जिल्हाधिकारी कार्यालय पायऱ्यावर ठिय्या;

## उपनगराध्यक्षांसह नगरसेवकांकडूनही आत्मदहनाचा इशारा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



धुळे जिल्ह्यातील साक्री नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष जयश्री पवार यांच्या विरोधात काही नगरसेवकांनी विरोधी गटात सामील होत धुळे जिल्हाधिकारी यांच्याकडे १८ जून रोजी अविश्वास प्रस्ताव दाखल केला होता. या पार्श्वभूमीवर आज अविश्वास प्रस्तावावर चर्चा आणि मतदान होणार होते. मात्र, उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक (Election) निर्णय अधिकारी रोहन कुवर हे साक्री नगरपंचायत कार्यालयात वेळेवर उपस्थित न झाल्याने काही काळ अविश्वास प्रस्ताव आणि चर्चा प्रक्रिया रेंगाळल्याने अविश्वास प्रस्तावाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तर, सरकारी अनास्थेविरोधात आत्मदहन करण्याचा इशारा विद्यमान उपनगराध्यक्ष बापू गीते आणि शिंदे गटाचे नगरसेवक पंकज मराठे यांनी दिला आहे.

साक्री नगरपंचायतीमध्ये भाजपचे ११ नगरसेवक निवडून आल्याने बहुमताची सत्ता त्यांच्याकडे आहे. मात्र, नगराध्यक्षांच्या विरोधात त्यांच्या कारभारासंदर्भात ६ नगरसेवकांनी तीन वर्षानंतर नाराजी व्यक्त करत अविश्वास प्रस्ताव आणण्याच्या हालचाली सुरू केल्यास त्याला विरोधक सदस्यांचे पाठबळ मिळाल्याने अविश्वास प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे दाखल करण्यात आला आहे. त्याच पार्श्वभूमीवर आज दुपारी अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे कोणतीही प्रशासकीय प्रक्रिया पार पाडली गेली नसल्याने अविश्वास प्रस्तावासंदर्भात अनेक चर्चांना उधाण आले आहे. दरम्यान, निवडणूक निर्णय अधिकारी वेळेवर उपस्थित का झाले नाहीत हा देखील प्रश्न नगरसेवकांनी उपस्थित केला. यावेळी नगराध्यक्ष जयश्री पवार आणि त्यांच्यासोबत असलेले इतर चार ते पाच सदस्यांनी वेळ संपल्याचे सांगत निघून जाण्याचे पसंत केले.

उपनगराध्यक्षांचा आत्मदहन करण्याचा इशारा

आता नगराध्यक्षांविरुद्धच्या अविश्वास प्रस्तावावरुन वातावरण चिघळलं असल्याने हे प्रकरण नेमकं कोणत्या वळणावर येऊन ठेपेल याची उत्सुकता देखील निर्माण झाली आहे. निवडणूक प्रक्रियेतील कामकाज आणि सदस्यांना मिळालेले लेखी पत्र, यात कुठेही कार्यालयीन कामकाजाची वेळ निश्चित नसल्याने अविश्वास ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य बाहेर पडले तर अविश्वास प्रस्तावाच्या समर्थनार्थ सभागृहात काही सदस्य उपस्थित आहेत. आता, यावर नेमका काय तोडगा निघतो हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे दरम्यान, नगराध्यक्षांवरील अविश्वास प्रस्ताव केवळ अधिकाऱ्यांच्या गैरहजेरीमुळे बारगळला असल्याने यामागे काही षडयंत्र तर नाही ना असा देखील प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे. त्यामुळेच, सरकारी अनास्थेविरोधात आत्मदहन करण्याचा इशारा विद्यमान उपनगराध्यक्ष बापू गीते आणि शिंदे गटाचे नगरसेवक पंकज मराठे यांनी दिला आहे.

आमदाराचा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पायऱ्यावर ठिय्या

जो पर्यंत अविश्वास ठरावासंदर्भात प्रक्रिया पार पडत नाही, तोपर्यंत मागे न हटण्याचा निर्णय नगरसेवकांनी घेतला असून याबाबत जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्याशी चर्चा करण्यासाठी साक्री विधानसभा मतदारसंघाच्या शिवसेना शिंदे गटाच्या आमदार मंजुळा गावित या जिल्हाधिकारी कार्यालयात आल्या होत्या. मात्र, या ठिकाणी आल्यानंतर जिल्हाधिकारीच उपस्थित नसल्याने आमदार मंजुळा गावित यांनी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या पायऱ्यांवरच ठिय्या दिला असून जोपर्यंत अविश्वास ठरावा संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडून ठोस आश्वासन मिळणार नाही तोपर्यंत इथून न उठण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. अविश्वास ठरावाची निवडणूक ही कोणाच्या तरी दबावाखाली होऊ दिली नसल्याचा आरोप मंजुळा गावित यांनी केला आहे.

# साक्री नगराध्यक्षांविरोधातील अविश्वास ठराव रखडला;

## निवडणूक अधिकारी गैरहजर, रस्ता रोको आंदोलनाने वातावरण तापले

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

----------------------





साक्री नगरपंचायतीतील सत्तासंघर्षाने आज टोक गाठले, जेव्हा नगराध्यक्षा जयश्री पवार यांच्याविरोधातील अविश्वास ठरावावर चर्चा व मतदान होणार असतानाच निवडणूक निर्णय अधिकारी रोहन कुवर हे नियोजित वेळेपर्यंत अनुपस्थित राहिले. परिणामी, संपूर्ण प्रक्रिया रखडली असून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

या प्रशासकीय निष्क्रियतेच्या निषेधार्थ विरोधी गटाने शेवाळी फाट्यावर तीव्र रस्ता रोको आंदोलन छेडले. शिंदे गटाचे नेते तुळशीराम गावित यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात भाजपचे धुळे जिल्हा उपाध्यक्ष चंद्रभैय्यासो भामरे तसेच भाजपचे अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते. प्रशासनावर राजकीय दबावाखाली काम करत असल्याचा आरोप करत आंदोलनकर्त्यांनी " लोकशाहीची हत्या थांबवा" अशा जोरदार घोषणा दिल्या.

अविश्वास प्रस्तावाची पार्श्वभूमी

साक्री नगरपंचायतीत सध्या भाजपचे ११ नगरसेवक असून, जयश्री पवार नगराध्यक्षा आहेत. मात्र, त्यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करत पक्षातीलच सहा नगरसेवकांनी शिंदे गटात सामील होऊन विरोधी गट तयार केला आहे. या गटाने १८ जून रोजी जयश्री पवार यांच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल केला होता. २५ जून रोजी दुपारी १२:३० वाजता या प्रस्तावावर चर्चा आणि मतदान ठरले होते. मात्र, निवडणूक निर्णय अधिकारी नियोजित वेळेपर्यंत आलेच नाहीत. प्रशासनाकडून कोणतीही अधिकृत प्रक्रिया सुरू न झाल्याने जयश्री पवार व त्यांच्या गटातील चार सदस्य सभागृहातून निघून गेले आणि बैठक अपूर्णच राहिली.

संतप्त प्रतिक्रिया व आंदोलन

निवडणूक अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे संतप्त झालेल्या विरोधी गटाने तातडीने रस्त्यावर उतरत शेवाळी फाट्यावर तीव्र आंदोलन केले. गावित आणि भामरे यांनी प्रशासनावर राजकीय दबावाखाली काम केल्याचा आरोप करत, ही सरळसरळ लोकशाहीची हत्या असल्याचा आरोप लावला. "प्रशासन सत्ता वाचवण्यासाठी बोगस मार्गांचा अवलंब करत आहे," असा आरोप करत काही कार्यकर्त्यांनी आत्मदहनाचा इशाराही दिला. आंदोलनामुळे काही वेळ वाहतूक विस्कळीत झाली. पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत आंदोलकांना शांत केले, मात्र यामुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

पुढील काय?

सध्या अविश्वास ठरावाची प्रक्रिया रखडलेली आहे. निवडणूक अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमागील कारण स्पष्ट झालेले नाही. यामागे राजकीय हस्तक्षेपाचा संशय व्यक्त केला जात आहे. जिल्हा प्रशासनाने याबाबत तातडीने खुलासा देऊन पुढील प्रक्रिया पारदर्शकपणे राबवावी, अशी मागणी विरोधी गटाने केली आहे.

लोकशाही धोक्यात

साक्रीतील ही घटना केवळ स्थानिक सत्तासंघर्ष न राहता, संपूर्ण लोकशाही प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारी ठरत आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची अनुपस्थिती ही केवळ प्रशासकीय चूक की राजकीय दबावाखाली घेतलेला निर्णय — हे सखोल तपासणे अत्यंत आवश्यक आहे. नागरिकांचेही या प्रकरणाकडे लक्ष लागले आहे.

# साक्री नगरपंचायतीत अविश्वास ठरावावर मतदान टळले;

## आमदार मंजूळा गावित यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयात ठिय्या आंदोलन

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------



साक्री नगरपंचायतमधील काही नगरसेवकांनी मुख्याधिकाऱ्यां विरोधात दाखल केलेल्या अविश्वास ठरावावर आज चर्चा व मतदान होणार होते. मात्र, मतदानासाठी नियुक्त प्रांत अधिकारी रोहन कुवर हे अनुपस्थित राहिल्याने मतदानाची प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली. त्यामुळे नगरसेवकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, त्यांनी ठराव मागे घेण्याचा कोणताही निर्णय घेतलेला नसल्याचे स्पष्ट केले आहे.

यासंदर्भात साक्री विधानसभा मतदारसंघाच्या आमदार माननीय मंजूळा गावित यांनी जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्याशी चर्चा करण्यासाठी धुळे जिल्हाधिकारी कार्यालय गाठले. मात्र, त्या कार्यालयात उपस्थित नसल्याने संतप्त शिवसेना कार्यकर्त्यांनी आमदार गावित यांच्या नेतृत्वाखाली ठिय्या आंदोलन सुरू केले.

शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी स्पष्ट केले की, "जोपर्यंत अविश्वास ठरावावर मतदानाची प्रक्रिया पूर्ण होत नाही, तोपर्यंत हे आंदोलन सुरूच राहील."

साक्री नगरपंचायतीतील ही राजकीय उलथापालथ आता अधिक चिघळण्याची शक्यता असून, जिल्हा प्रशासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# आयजीना जीववर बायजी उदार,
# अरे ओ धुळे मन्नप्पा, कितने आदमी थे?
# पालिके, यात तुमचा वाटा कुठे आहे हो!

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------



'नही बुट, नही मोजा, राबराबे कर्मचारी, रेनकोट घाली साहेब, उभा तठे अधिकारी' या शिर्षकाखाली माझे पत्रक समाज माध्यम व काही वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले होते. हे वाचून धुळे महापालिकेचे कर्तव्यतत्पर सचिव मनोज वाघ यांनी संदेश पाठविला की, उपलब्धतेनुसार कर्मचाऱ्यांना वाटप करण्यात येईल. वृत्ताची दखल घेतल्याबद्दल आभार!

काल स्वच्छ महाराष्ट्र (नागरी) व सफाई मित्र सुरक्षा अभियान अंतर्गत राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्तीय महामंडळ (N S K F D C) यांच्या मार्फत प्राप्त झालेल्या P P E किट गटार सफाई कर्मचारी व ड्रेनेज कर्मचारी अशा १६१ कर्मचाऱ्यांना पीपीई किट वितरीत करण्यात आले. त्याबद्दल पालिकेचे मी कौतुकच करतो. माझे एव्हढेच म्हणणे आहे की, सफाई विभागात प्रत्यक्ष फिल्डवर काम करणारे कर्मचारी व वाटप झालेले कर्मचारी यातील संख्येत ताळमेळ जुळतो काय? या सुविधेपासून जे वंचित राहीले त्यांचे काय? जे वितरीत करण्यात आले ते राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्तीय महामंडळाच्या मालकीचे आहे यात पालिकेचा वाटा किती आहे हो? मग हे 'आयजीना जीववर बायजी उदार' नाही काय? फुकाचे श्रेय कशासाठी? जे रेनकोट वाटप करण्यात आले ते पावसाच्या बचावासाठीचे रेनकोट आहेत की गटारीत काम करण्यासाठी लागणारे डंगरी सुट? या शंकेचे निरसन झाले पाहिजे. आवश्यक सुविधांपासून कुठलाही सफाई कामगार दुर्लक्षीत राहणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. तुमचे अभियान खरंच यशस्वी व्हायचे असेल तर सेफ्टी हेल्मेट, गमबुट, सेफ्टी गॉगल, एन-९५ मास्क, डंगरी सुट, हाफ कॅसमॉस, केमीकल ग्लोज, रेनकोट हे त्यांच्या हक्काचे त्यांना उपलब्ध करून दिलेच पाहिजे. सफाई कामगार म्हणजे 'मुकी बिचारी कुणीही हाका' त्यांना 'माणूस' म्हणून जगू देण्यासाठी पालिकेला 'माणसाळलेले' व्हावे लागेल.

किट उनात केंद्रामाई बारा,
अन लागावं शेतस सोया...
जेले भेटणं तो रंगा खुश,
बाकींना चोयथीन डोया.

# ॥॥ लोककल्याणकारी राजा: दलित-पतित उद्धारक ॥॥
# २६ जून: छ.शाहू महाराज जयंती व सामाजिक न्याय दिन

राजर्षी शाहू महाराजांची विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी भेट झाली. बाबासाहेबांच्या मूकनायक या वृत्तपत्रास व पुढे त्यांच्या इंग्लंडमधील उच्चशिक्षणास त्यांनी अर्थसाहाय्य केले. माणगाव व नागपूर येथील अस्पृश्यता निवारण परिषदांत त्यांच्याबरोबर सहभागी होऊन अस्पृश्यांना त्यांचा खरा पुढारी मिळाल्याबद्दल त्यांनी त्यांचा गौरव केला. अस्पृश्यतेबरोबरच जातिभेदाशी त्यांनी अखेरपर्यंत संघर्ष केला. आंतरजातीय विवाह हा जातिभेदावर रामबाण उपाय वाटून त्यांनी आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. स्वत: पुढाकार घेऊन अनेक आंतरजातीय विवाह घडवून आणले. तसेच बालविवाहास प्रतिबंध करून नोंदणी विवाहाचा कायदा जारी केला. घटस्फोटास व विधवापुनर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली. कुटुंबात होणाऱ्या शारीरिक व मानसिक छळांपासून स्त्रीला संरक्षण देणारा कायदाही त्यांनी मंजूर केला. मागासलेल्या वर्गांतील मुलींना व स्त्रियांना मोफत शिक्षणाची सुविधा निर्माण केली. आपली राजकीय कारकीर्द समस्त समाजांना न्याय देण्यात खर्ची घातली होती, म्हणूनच त्यांची जयंती सामाजिक न्याय दिन म्हणून उत्साहाने साजरी केली जाते.

सामाजिक सुधारणांबरोबरच त्यांनी शेतीस व उद्योगधंद्यांस प्रोत्साहन दिले. अनेक कृषी व औद्योगिक प्रदर्शने भरविली. पन्हाळ्यावर चहा, कॉफी, रबर यांच्या लागवडींचे प्रयोग केले. कृषी उत्पादनासाठी शाहूपुरी, जयसिंगपूर यांसारख्या बाजारपेठा वसविल्या. त्यामुळे कोल्हापूर ही गुळाची बाजारपेठ म्हणून देशात प्रसिद्ध पावली. शाहूंनी कोल्हापुरात कारखानदारीचा पाया रचला. शाहू मिलची स्थापना करून आधुनिक वस्त्रोद्योगास त्यांनी चालना दिली. शाहूंनी बांधलेले राधानगरीचे धरण कृषी क्षेत्रात संस्थानचा कायापालट करणारा उपक्रम ठरला. संस्थानी मुलखातील हे सर्वांत मोठे धरण बांधून त्यांनी आपले संस्थान सुजलाम्सुफलाम्करून टाकले. त्यांनी सहकारी संस्थांचा कायदा करून सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली.

छत्रपती शाहू महाराज कोल्हापूर महाराष्ट्रातील करवीर तथा कोल्हापूर संस्थानचे प्रागतिक अधिपती आणि थोर समाजसुधारक होत. प्राथमिक शिक्षण, जातिभेद-निवारण, अस्पृश्यता-निवारण आदी सुधारणांचे पुरस्कर्ते होते. त्यांचा जन्म दि.२६ जून १८७४ रोजी कागलच्या जहागीरदार घाटगे घराण्यात जयसिंगराव आणि राधाबाई या दांपत्याच्या पोटी झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव यशवंतराव होते. चौथ्या शिवाजींच्या अकाली निधनानंतर ते दि.१७ मार्च १८८४ रोजी कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले. राजकोट व धारवाड येथे त्यांचे शिक्षण झाले. सर फ्रेझर व रघुनाथराव सबनीस यांसारखे गुरू त्यांना मिळाले. विद्यार्थिदशेत त्यांनी इंग्रजी, संस्कृत, इतिहास, राज्यशास्त्र इ. विषयांचा अभ्यास केला. त्यांना दि.२ एप्रिल १८९४ रोजी राज्याधिकार प्राप्त झाला. तत्पूर्वी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या कन्येबरोबर सन १८९१ साली त्यांचा विवाह झाला. त्यांना राजाराम व शिवाजी हे दोन मुलगे आणि राधाबाई- आक्कासाहेब व आऊबाई या दोन कन्या झाल्या. त्यांनी प्रशासन- यंत्रणेनची पुनर्रचना करून बहुजन समाजातील कर्तबगार व गुणी व्यक्तींना अधिकारावर नेमण्यास सुरुवात केली. सन १८९७-९८ साली प्रथम दुष्काळ व नंतर प्लेग अशी संकटे कोसळली.

मागासलेल्या जातींत शिक्षणाबद्दल फारशी आस्था नसल्याने व त्याचे कारण शिक्षण घेऊनही सरकारी नोकरी लाभण्याची शक्यता नसल्याने त्यांनी दि.२६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानातील ५० टक्के शासकीय नोकऱ्या मागास वर्गासाठी राखीव ठेवल्याचा जाहीरनामा काढला. राखीव जागांचे धोरण अमलात आणणारे ते भारतातील पहिले राज्यकर्ते ठरले. अस्पृश्यतेचे उच्चाटन हे आपले जीवितकर्तव्य मानले. संस्थानातील शाळा, पाणवठे, विहिरी, दवाखाने, कचेऱ्या आदी सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळण्यास त्यांनी कायद्याने प्रतिबंध केला. त्यासाठी अनेक वटहुकूम जारी केले. त्यांनी अस्पृश्यांना सरकारी नोकरीत घेतले. समाजातील तलाठ्यासारख्या प्रतिष्ठेच्या जागा दिल्या. त्यांच्यापैकी अनेकांना माहूत, हूलस्वार, पोलीस, स्वत:चे मोटारचालक म्हणून नेमले. भटक्या व विमुक्त जातींना जवळ करून त्यांचे जीवन स्थिर केले. त्यांना आपले रक्षक म्हणून नेमले. खेड्यापाड्यांतील बलुतेदारांनाही त्यांच्या बलुतेपद्धतीतून मुक्त करून त्यांना समाजातील सर्व उद्योगधंदे खुले केले. जोगिणी व देवदासी प्रथेस प्रतिबंध करणारा कायदा जारी केला. सन १९०२ साली सातव्या एडवर्डच्या राज्यारोहणानिमित्त त्यांनी युरोपचा दौरा केला. तेथील भौतिक प्रगतीचा मोठा प्रभाव त्यांच्यावर पडला; त्यामुळे त्यांचे अनुभवविश्व समृद्ध झाले. बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र, अज्ञान व अंधश्रद्धा नष्ट होणार नाहीत, हे जाणून त्यांनी शिक्षणाच्या, विशेषत: प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला. त्यानुसार त्यांनी आपल्या संस्थानात सन १९१७मध्ये सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि तो अमलात आणला. प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केली. ते शिक्षणसम्राट महात्मा फुलेंच्या सत्यशोधक विचारसरणीकडे आकृष्ट झाले. सत्यशोधक तत्त्वांना त्यांचा पाठिंबा होता. मराठ्यांसाठी सन १९२०मध्ये स्वतंत्र क्षात्र जगद्गुरू पद निर्माण करून त्यावर सदाशिवराव पाटील या उच्चविद्याविभूषित तरुणास नेमले. त्यांनी संगीत, नाट्य, चित्रकला, मल्लविद्या आदी कलांना राजाश्रय देऊन महाराष्ट्रात कलेच्या क्षेत्रात स्पृहणीय कामगिरी केली. अनेक गायक-गायिकांनी त्यांच्या आश्रयाने भारतभर कीर्ती संपादन केली. त्यांनी अनेक नाटक कंपन्यांना व गुणी कलावंतांना आश्रय दिला. मल्लविद्येच्या प्रांतात त्यांनी संस्थानासह सर्व देशांतील मल्लांना उदार आश्रय दिला. रोमच्या आखाड्याच्या धर्तीवर कोल्हापुरात कुस्तीचे मैदान बांधले. त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूर ही मल्लविद्येची पंढरी बनली. दस्तूरखुद्द महाराज हे मल्लांचे मल्ल म्हणून प्रसिद्ध होते. पट्टीचा शिकारी म्हणून त्यांचा लौकिक होता. छ.शाहूंच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून कानपूर येथे कुर्मी क्षत्रिय सभेने सन १९१९ साली त्यांना राजर्षी पदवी बहाल केली. त्यांच्या कार्यामुळे दलित-पतितांचा उद्धारक, रयतेचा राजा म्हणून त्यांची प्रतिमा जनसामान्यात निर्माण झाली. या राजाने अज्ञानी बहुजन समाजाला जागृत करण्याचे व्रत अखेरपर्यंत सांभाळले.

अखेरच्या दिवसांत द्वितीय चिरंजीव शिवाजी यांच्या अपघाती निधनाने सन १९१८मध्ये ते खचून गेले, तशातच मधुमेहाने ते ग्रासले होते. अखेर मुंबई येथे दि.६ मे १९२२ रोजी त्यांचे वयाच्या अवघ्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यानंतर त्यांचे पुत्र राजाराम महाराज कोल्हापूरच्या गादीवर आले.

!! सामाजिक न्याय दिन व पावन जयंतीनिमित्त त्यांना व त्यांच्या लोककल्याणकारी कार्यांना मानाचा लवून मुजरा !!

---------------------------

लेखक
श्री कृष्णकुमार आनंदी-
गोविंदा निकोडे गुरूजी
भारताच्या वैभवशाली इतिहासाचे
अस्मितेचे गाढे अभ्यासक गडचिरोली

# धुळे येथे आणीबाणीच्या ५० व्या वर्षपूर्तीनिमित्त 'संघर्षयात्रीं'चा गौरवः हुकूमशाहीच्या काळ्या पर्वाची आठवण

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत




धुळे, भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील एक काळा अध्याय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणीबाणीला आज ५० वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने धुळे येथे आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेल्या ३५ 'संघर्षयात्रीं' चा जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे गौरवपत्र, गुलाबपुष्प देऊन या स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी आयोजित प्रदर्शनाची पाहणीही जिल्हाधिकारी श्रीमती विसपुते यांच्यासह इतर मान्यवरांनी केली.

या कार्यक्रमात आणीबाणीचा अनुभव घेतलेले ज्येष्ठ संघर्षयात्री मदनलाल मिश्रा यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. "आणीबाणीत मनमानीपणाचा कळस गाठून प्रचंड प्रमाणात अत्याचार करण्यात आले. सर्वसामान्यांनी नरकयातना भोगल्या. पोलिसांनी या काळात प्रचंड अत्याचार केले," असे ते म्हणाले. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यामुळे लादलेली आणीबाणी ही भारताच्या प्राचीन लोकशाही मूल्यांवर घाला घालणारी होती, असे मिश्रा यांनी नमूद केले.

मदनलाल मिश्रा यांनी १२ जून १९७५ रोजी इंदिरा गांधी यांना सहा वर्षांसाठी निवडणूक लढण्यास बंदी घालण्यात आल्याची आठवण करून दिली. सर्वोच्च न्यायालयातून निराशा मिळाल्यानंतर इंदिरा गांधी यांनी आणीबाणी लागू केली. "या काळात हुकूमशाहीला विरोध करणाऱ्यांवर अनन्वित अत्याचार करण्यात आले. अनेकांचे हात-पाय तोडण्यात आले, काहींना जीवानीशी मारण्यात आले. भयानक परिस्थिती असताना ज्यांनी कारावास भोगला, त्यांच्या परिवारावरही मोठे संकट कोसळले होते," असे त्यांनी सांगितले. कारावास भोगलेल्यांप्रमाणेच त्यांच्या कुटुंबांचे योगदानही तितकेच मोठे होते, असे सांगत त्यांनी त्यावेळी पोलिसांची प्रचंड दहशत होती असेही नमूद केले. शासन स्तरावरून आज संघर्षयात्रींचा सन्मान होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

'कैद्याप्रमाणे वागणूक आणि कुटुंबांवर संकटे': रवी बेलपाठक

यावेळी बोलताना रवी बेलपाठक यांनी ४ जुलै रोजी संघावर बंदी घालण्यात आल्याची आठवण करून दिली. त्यांनी संघाच्या कामात स्वतःला झोकून दिले होते आणि त्यावेळी पुकारलेल्या सत्याग्रहात सहभागी झाले होते. १४ नोव्हेंबर १९७५ रोजी झालेल्या पहिल्या सत्याग्रहात त्यांनी लोकांना उद्युक्त करण्याचे काम केले. "कारागृहात आम्हाला कैद्याप्रमाणे वागणूक मिळत होती. तो काळ अतिशय वाईट होता," असे बेलपाठक यांनी सांगितले. त्यावेळी समाजमाध्यमे नसल्याने एकमेकांशी संपर्क साधूनच बातम्या समजत होत्या आणि सरकार सांगेल त्याच बातम्या प्रसारित होत होत्या, असेही त्यांनी नमूद केले. २१ ते २२ महिन्यांचा काळ त्यांनी तुरुंगात घालवला. आणीबाणीच्या काळात अनेक जण तुरुंगात अडकल्यामुळे त्यांच्या कुटुंबांवर मोठे संकट कोसळले, मुलांचे शिक्षण आणि आरोग्याकडे दुर्लक्ष झाले, यावर त्यांनी भर दिला.

धुळ्यातील गौरवलेले संघर्षयात्री

यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती विसपुते यांच्या हस्ते गौरवण्यात आलेल्या धुळे जिल्ह्यातील आणीबाणीतील कारावास भोगलेल्या संघर्षयात्रींमध्ये मदनलाल जमनालाल मिश्रा, भिमसिंग रायसिंग राजपूत, माधव जनार्दन बापट, मधुसूदन उर्फे विजय शांताराम पाच्छापुरकर, यादवराव शामराव पाटील (प्रतिनिधी), प्रकाश त्र्यंबक कुलकर्णी, गोपालदास जमनालाल मिश्रा (प्रतिनिधी), हरसिंग गोरखसिंग जमादार (गिरासे), शशिकांत रनाळकर (प्रतिनिधी), रविंद्र बेलपाठक, रेणुका बेलपाठक, शेखर वसंत चंद्रात्रे (प्रतिनिधी), भास्कर बापट, प्रभाकर भावसार, डॉ. भुपेंद्र शहा, शीला सत्यानारायण अग्रवाल, मंजुळाबाई श्रीपत पाटील, मालती नवनीतलाल शाह, पुष्पा सुभाष शर्मा, प्रविण कृष्णदास शहा, श्रीराम पुरुषोत्तम कुलकर्णी, शशिकला सोमनाथ जोशी (प्रतिनिधी), प्रकाश त्र्यंबक मराठे, शशीकला देविदास शार्दुल, रविंद्र वामन सोनवणे, भिकुबाई शामराव मराठे, डोंगर कन्हैया बागुल, शकुंतलाबाई जूगलकिशोर अग्रवाल यांचा समावेश होता.

या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी श्रीमती भाग्यश्री विसपुते यांच्यासह अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, उपजिल्हाधिकारी महादेव खेडकर, जिल्हा माहिती अधिकारी विलास बोडके, नायब तहसीलदार श्रीकांत देसले, यांच्यासह आणीबाणीत कारावास भोगलेल्या व्यक्ती, त्यांचे कुटुंबिय आणि वारस मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा गौरव सोहळा आणीबाणीच्या काळात लोकशाही मूल्यांच्या संरक्षणासाठी केलेल्या त्यागाची आणि संघर्षाची आठवण करून देणारा ठरला.

# शेतकऱ्यांचे विनाविलंब व विना शर्त पिक कर्ज मंजूर करण्याच्या मागणीसाठी शिवसेनेच्या वतीने इंडिया बॅंकेसमोर निदर्शने

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------



सद्यस्थितीत शेतमालाला हमीभाव मिळत नाही. नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांची अवस्था दयनीय झाली असून राज्य शासनाच्या वतीने पीक विम्याचे धरसोडीचे धोरण सुरू आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना पुरेसे प्रमाणात पीक कर्ज मिळण्याची आवश्यकता आहे.

परंतु पिक कर्जासाठी शेतकऱ्यांचे अर्ज आल्यानंतर ही राज्य शासनाचे त्वरित कर्ज मंजूर करण्याचे निर्देश असतानाही शेकडो अर्ज बॅंकेत प्रलंबित आहे. सदर अर्ज त्वरित निकाली काढण्याचे आवश्यक असताना हे अर्ज मुख्य शाखा व विभागीय शाखा यांच्याकडे पाठवून शेतकऱ्यांना नाहक त्रास दिला जात आहे. सिबिल व थकबाकी दाखवून अन्य काही तांत्रिक बाबी दाखवून पिक कर्ज नाकारले जात आहे.

या परिस्थितीत शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने बॅंकांना जाब विचारण्यासाठी बॅंकांची शाळा हा आंदोलनात्मक कार्यक्रम राबवत असून शेतकऱ्यांचे पिक कर्ज त्वरित मंजूर करावे. कोणतेही तांत्रिक कारण दाखवून पिक कर्ज नाकारू नये, . शेतकऱ्यांना नाहक त्रास दिला तर शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आपल्या विरोधात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे देऊन देगलूर येथील इंडिया बॅंकेसमोर निदर्शने करण्यात आली यावेळी शिवसेना सहसंपर्कप्रमुख दयाल गिरी, उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, तालुका प्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापुरकर, मतदारसंघ संघटक राजेंद्र इंगळे खानापूरकर, मतदारसंघ प्रमुख पांडुरंग पाटील थडके देगावकर, शहर प्रमुख संजय अण्णा जोशी, शहर संघटक भगवान जाधव, उपशहरप्रमुख मण्णाजी पैलावार उपशहरप्रमुख बाबुराव मिनकीकर, युवा सेना तालुका समन्वयक तथा शिवसेना सोशल मीडिया तालुका प्रमुख भागवत पाटील सोमुरकर, अल्पसंख्याक सेना तालुका प्रमुख युसुफभाई मिस्त्री, अल्पसंख्याक सेना शहर प्रमुख सय्यद हनुमिया मिरभाई, शिवसेना शहर समन्वयक विनोद सोनकांबळे, युवा सेना उपशहरप्रमुख गणेश चप्पलवार, युवा सेना उपशहरप्रमुख संदीप शिंदे, सर्कल प्रमुख सुभाष खुनेवाड, सर्कल प्रमुख शंकर जाधव हाळीकर आदी प्रमुख पदाधिकारी सह शेकडो शिवसैनिक, शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

# धुळे व नंदुरबार जिल्हा शिक्षक सहकारी पतसंस्थेकडून खातेदार स्व. गिरीश गावीत यांच्या वारसास 20 हजाराचा धनादेश वाटप

नंदुरबार प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------



धुळे व नंदुरबार जिल्हा सहकारी पतपेढीचे खातेदार असलेले सभासद स्व.गिरीश साकऱ्या गावित प्राथमिक शिक्षक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोठली केंद्र मोलगी तालुका अक्कलकुवा येथे कार्यरत शिक्षक यांचे अचानक हृदयविकाराचा तीव्र झटक्याने दिनांक १८ जून २०२५ रोजी निधन झाले. त्यांचे नंदुरबार जिल्हा शिक्षक सहकारी पतपेढीचे सभासद होते व त्यांना संस्थेच्या वतीने तातडीची मदत म्हणून २० हजार रुपयांचा धनादेश त्यांच्या राहत्या घरी के. आर. सनसिटी, नवापूर रोड नंदुरबार येथे धनादेश चेक महाराष्ट्र राज्य प्रहार शिक्षक संघटनेचे नंदुरबार जिल्हाध्यक्ष गोपाल गावीत यांच्या हस्ते त्यांच्या पश्चात धनादेश त्यांच्या कुटुंबिय गिरीश गावित यांची पत्नी राजमेरी गावित, मुलगा अभिषेक गावित, कन्या सुवर्णा वळवी, कन्या ऐश्वर्या गावित यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. याप्रसंगी धुळे व नंदुरबार जिल्हा शिक्षक सहकारी पतसंस्थेचे संचालक पुरुषोत्तम (अण्णासाहेब) काळे यांनी कुटुंबाला पेन्शन व इतर विमा योजना, कै. नानासाहेब मुरलीधर शिंदे मृत्यू फंड योजना बाबत माहिती दिली. तसेच कागदपत्र जमा झाल्यानंतरच उर्वरित रक्कम पतसंस्थेकडून लवकरच निधी कुटुंबीयांकडे सुपूर्त करण्यात येईल असेही आश्वासन देण्यात आले. याप्रसंगी संचालक राजू चौरे यांनी आज जी स्व. गिरीष गावीत यांच्या कुटुंबावर वेळ आली आहे, ती कोणावरही येऊ नये. सध्या धावपळीच्या जीवनात कोणाचेही काहीही सांगता येत नाही. हे कोरोनाने सर्वांना शिकवले आहे. प्रत्येक व्यक्तीला आपल्यानंतर आपल्या कुटुंबाचं कसं होणार याची चिंता भेडसावत असते. त्यामुळे धुळे व नंदुरबार जिल्हा शिक्षक सहकारी पतसंस्थेचे सभासद असेल तरच आपल्यानंतरही आपल्या कुटुंबास आपण मदत करू शकतो. भविष्यात कुटुंबावर कोणत्याही प्रकारची अडचण असल्यास मदत करण्यात येईल असेही मत व्यक्त केले. यावेळी स्व.गिरीश गावित सर यांच्या शाळेतील सहशिक्षक गुलाब पाटील, लोकहिताय शिक्षक गटाचे सच्चे कार्यकर्ते रामकृष्ण बागल, पतसंस्थेचे सभासद हेमंत नाईक, अविनाश गावित, मनीष वसावे, ईश्वर गावित, गणेश पाटील आदी उपस्थित होते.

शतायुषी हो बाळा..
दैनिक स्वराज्यदूत सादर करीत आहे एक नवीन सदर....
आपल्या चिमुरड्याच्या वाढदिवसाला आम्ही देऊ प्रसिद्धी
फक्त आणि फक्त १५०/ रुपयात... तर मग पाठवा आपल्या
चिमुरड्याचा फोटो आणि शुभेच्छुक यांचे नाव आमच्या नंबरवर
आणि साजरा करा आपल्या चिमुरड्याचा वाढदिवस
दैनिक स्वराज्यदुतच्या लाखो वाचकांसह
आपल्या चिमुकल्याचे वाढदिवसाचे फोटो पाठविण्यासाठी मोबा. नंबर ८४४६६७३६७७

# महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

## स्वराज्यदूत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान...
स्वराज्याचा मान !!




महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये

कौतुक तुमच्या कार्याचे

उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!
SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

### प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत dainikswarajyadoot@gmail.com या इ-मेल वर पाठवायचा आहे.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
**8446673677 / 8010232449**